**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य**
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - १६**
Phone No: 020/26051512 Web:www.dhepune.gov.in E-mail : law.dhepune@nic.in

क्र. विधी-३४२४/प्र.क्र. १८(ई-५०१६९५)/सीईटीसेल/ दिनांक : १४/०५/२०२४

**परिपत्रक -**

**विषय : उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील व्यावसायिक अभ्यासक्रम केंद्रीय प्रवेश प्रक्रिया शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता महाविद्यालय नोंदणी करणेबाबत.**

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २८ अन्वये शासनास प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन शासनाने विधी ५ वर्ष, विधी ३ वर्ष, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., बी.ए./बी.एस्सी.बी.एड., आणि बी.एड.-एम.एड. हे अभ्यासक्रम व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून अधिसूचित केलेले असून सदरहू अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची नियमावली राजपत्रामध्ये प्रसिध्द केलेली आहे. त्यानुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून अधिसूचित केलेल्या अभ्यासक्रमांचे प्रवेश हे सक्षम प्राधिकारी म्हणून मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत होत आहेत.

सद्यस्थितीत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिताच्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या राज्य सामायिक प्रवेश परीक्षेची कार्यवाही अंतिम टप्प्यात आलेली आहे. त्यानुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विधी ५ वर्षे, विधी ३ वर्षे, बी.एड., एम.एड., बी.पी.एड., एम.पी.एड., बी.ए./बी.एस्सी.बी.एड. आणि बी.एड.-एम.एड. अभ्यासक्रमाच्या शासकीय / अशासकीय अनुदानित / अशासकीय अनुदानित अल्पसंख्याक/ विद्यापीठ संचलित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित अल्पसंख्याक/ कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु असणारी महाविद्यालये / विद्यापीठ विभाग यांनी सोबतच्या तक्ता क्र. १ मध्ये दर्शविण्यात आलेल्या संकेतस्थळावर **दिनांक १५.०५.२०२४ ते दिनांक २७.०५.२०२४** या कालावधीमध्ये ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणी करावी.

नावनोंदणी बाबतच्या सूचना :

१. अर्जामध्ये अचूक माहिती भरुन, सर्व कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे. अपलोड करण्यात येणारी कागदपत्र वाचनीय असावीत.
२. अर्जातील सर्व माहिती बिनचूकपणे भरण्यात येईल, याबाबत दक्षता घेण्यात यावी.
३. माहिती भरुन आवश्यक कागदपत्र अपलोड केल्यानंतर, सदरहू माहितीची व अपलोड केलेल्या कागदपत्रांची पुनश्च: एकदा फेरपडताळणी करुन सर्व तपशिल बरोबर असल्याची खातरजमा करावी, तद्नंतर सबमिट करावी.

४. अर्ज सबमिट झालेनंतर सदरहू अर्जाची प्रिंट काढून त्यावर प्राचार्यांची स्वाक्षरी करावी. तसेच अपलोड केलेल्या सर्व कागदपत्रांच्या सुस्पष्ट छायांकित प्रति संचालनालयास दिनांक ३१.०५.२०२४ रोजी दुपारी ०२.०० वाजेपर्यंत पोहोचतील अशा पध्दतीने पाठविण्यात याव्यात. शक्य असल्यास सदरहू नोंदणी प्रस्ताव हस्तपोच करावा.

५. महाविद्यालय नावनोंदणीसाठी रु. १५००/- इतके शुल्क आकारण्याबाबत प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये निर्णय घेण्यात येणार आहे. त्यानुषंगाने आपणास स्वतंत्रपणे अवगत करण्यात येईल.

६. आवश्यक कागदपत्रे अपलोड केलेली नसल्यास / सादर न केल्यास, संबंधित महाविद्यालयाचे नाव प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

Signed by
Prakash Dhondu Bachhav
Date: 14-05-2024 16:05:25

(डॉ. प्रकाश बच्छाव)
सहसंचालक
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत -

१. प्राचार्य, सर्व विधी महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
२. प्राचार्य, सर्व शिक्षणशास्त्र महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.
३. प्राचार्य, सर्व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य.

प्रत माहितीस्तव सविनय सादर -

१. मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.
२. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, फोर्ट, मुंबई - ०१.

**तक्ता क्र. १**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | संकेतस्थळ |
|---|---|---|
| १ | बी.एड. | https://bedcap24.mahacet.org/ |
| २ | एम.एड. | https://medcap24.mahacet.org/ |
| ३ | बी.पी.एड. | https://bpedcap24.mahacet.org/ |
| ४ | एम.पी.एड. | https://mpedcap24.mahacet.org/ |
| ५ | बी.ए./बी.एस्सी.बी.एड. | https://babscbedcap24.mahacet.org/ |
| ६ | बी.एड-एम.एड (एकात्मिक) | https://bedmedcap24.mahacet.org/ |
| ७ | विधी ३ वर्षे | https://llb3cap24.mahacet.org/ |
| ८ | विधी ५ वर्षे | https://llb5cap24.mahacet.org/ |

*****